# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ५ सप्टेंबर २०१९**

# विजयनगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण शनिवारी

**नागपूर, ता. ५ :** राष्ट्रीय आरोग्य अभियान नागपूर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र.४ मधील विजयनगर (भरतवाडा) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे शनिवारी (ता.७) पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. प्रभाग क्रमांक ४, बजरंग चौक (भरतवाडा) येथे सकाळी १० वाजता आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार राहतील.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, बसपा पक्षनेता वैशाली नारनवरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनेता दुनेश्वर पेठे, शिवसेना पक्षनेता किशोर कुमेरिया, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, लकडगंज झोन सभापती राजकुमार साहु, नगरसेविका निरंजना पाटील, नगरसेवक शेषराव गोतमारे, नगरसेविका मनिषा अतकरे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त

आयुक्त अझीझ शेख, आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे, आरोग्य अधिकारी (दवाखाना) डॉ. सरीता कामदार आदी उपस्थित राहतील.

कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मनपा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.